# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

क्रमांक :रापनों/२०१६/प्र.क्र.३२ /का-११,
पहिला मजला, नवीन प्रशासन विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २१/१०/२०१६

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

विषय:- नोंदणी रद्द झालेल्या नोंदणीकृत राजकीय पक्षांची नोंदणी कायम करण्याबाबत

महोदय,

उपरोक्त विषयास अनुलक्षून आपणांस कळविण्यात येते की, वार्षिक लेखा परिक्षित लेख्यांची प्रत व वार्षिक आयकर विवरणपत्राची प्रत सादर न केल्याकारणाने खालील राजकीय पक्षांची नोंदणी आयोगाने रद्द केली होती.

२. तथापि खालील पक्षांनी दंड भरुन दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ पर्यंत सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्याने त्यांची नोंदणी कायम करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नोंदणी कायम ठेवलेल्या राजकीय पक्षांची नांवे |
|---|---|
| ०१ | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खोब्रागडे) |
| ०२ | आंबेडकरवादी रिपब्लिकन पार्टी |
| ०३ | खान्देश विकास आघाडी, जळगांव |

आपली विश्वासू,

(रीना वि.फणसेकर)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक :रानिआ/रापनों-२०१६/ प्र.क्र.३२ /का-११
नवीन प्रशासकीय भवन , हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २०.१०.२०१६

## आदेश

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या क्रमांक : रानिआ/रापनों-२०१६/प्र.क्र.२१ /का-११, दि. १०.०५.२०१६ च्या आदेशान्वये **रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खोब्रागडे)** या राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत पक्षाने आदेशात नमूद केल्याप्रमाणे आयकर विवरणपत्रे व लेखा परीक्षण लेखे यांच्या विहित कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे राज्य निवडणूक आयोगाकडून या पक्षाची नोंदणी रद्द करण्यात आली होती,

आणि ज्याअर्थी, **रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खोब्रागडे)** या पक्षाने त्यांच्या दि. ०९.०८.२०१६ च्या पत्रान्वये दंडापोटी रू.१.०० लाख चा धनाकर्ष आयोगास सादर करून त्यापक्षाची नोंदणी रद्द करण्याच्या निर्णयाचा फेर विचार करण्याची विनंती केली होती,

आणि ज्याअर्थी, सर्व कागदपत्रांची पूर्तता उक्त राजकीय पक्षाने दि. ३०.९.२०१६ पर्यंत केलेली आहे,

आणि ज्याअर्थी, दि. २६.०८.२०१६ रोजी राज्य निवडणूक आयोगाने काढलेल्या परिपत्रकात मार्गदर्शक सुचना केल्या आहेत,

त्याअर्थी, **रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खोब्रागडे)** या पक्षाची नोंदणी राज्य निवडणूक आयोगाकडे कायम ठेवण्यात येत आहे.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(शेखर चन्ने)
सचिव ,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

अध्यक्ष / सचिव,
**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खोब्रागडे),**
टागोर नगर, ग्रुप नं. ५/ B, पोलिस लाईन, विक्रोळी पूर्व, मुंबई -८३

क्र.मा.प.

प्रत,

१. सर्व जिल्हाधिकारी,

२. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

३. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/रापनों-२०१६/ प्र.क्र.३२ /का-११
नवीन प्रशासकीय भवन , हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २१ ऑक्टोबर, २०१६

## आदेश

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या क्रमांक : रानिआ/रापनों-२०१५/प्र.क्र.२१ /का-११, दि. २०.०४.२०१६ च्या आदेशान्वये **खान्देश विकास आघाडी, जळगाव** या राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत पक्षाने आदेशात नमूद केल्याप्रमाणे आयकर विवरणपत्रे व लेखा परीक्षण लेखे यांच्या विहित कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे राज्य निवडणूक आयोगाकडून या पक्षाची नोंदणी रद्द करण्यात आली होती,

आणि ज्याअर्थी, **खान्देश विकास आघाडी, जळगाव** या पक्षाने त्यांच्या दि. २१.०९.२०१६ च्या पत्रान्वये दंडापोटी रू.१.०० लाख चा धनाकर्ष आयोगास सादर करून त्यापक्षाची नोंदणी रद्द करण्याच्या निर्णयाचा फेर विचार करण्याची विनंती केली होती,

आणि ज्याअर्थी, सर्व कागदपत्रांची पूर्तता उक्त राजकीय पक्षाने दि. ३०.९.२०१६ पर्यंत केलेली आहे,

आणि ज्याअर्थी, दि. २६.०८.२०१६ रोजी राज्य निवडणूक आयोगाने काढलेल्या परिपत्रकात मार्गदर्शक सुचना केल्या आहेत,

त्याअर्थी, **खान्देश विकास आघाडी, जळगाव** या पक्षाची नोंदणी राज्य निवडणूक आयोगाकडे कायम ठेवण्यात येत आहे.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(शेखर चन्ने)
सचिव ,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

अध्यक्ष / सचिव,
**खान्देश विकास आघाडी, जळगाव**
**६/३, खान्देश मिल शॉपिंग कॉम्प्लेक्स,**
**जळगाव - ४२५००१.**

प्रत,

१. सर्व जिल्हाधिकारी,
२. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
३. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/रापनों-२०१६/ प्र.क्र.३२ /का-११
नवीन प्रशासकीय भवन , हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २१ ऑक्टोबर, २०१६

## आदेश

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या क्रमांक : रानिआ/रापनों-२०१५/प्र.क्र.२१ /का-११, दि. २०.०४.२०१६ च्या आदेशान्वये **आंबेडकरवादी रिपब्लीकन पार्टी** या राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत पक्षाने आदेशात नमूद केल्याप्रमाणे आयकर विवरणपत्रे व लेखा परीक्षण लेखे यांच्या विहित कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे राज्य निवडणूक आयोगाकडून या पक्षाची नोंदणी रद्द करण्यात आली होती,

आणि ज्याअर्थी, **आंबेडकरवादी रिपब्लीकन** पार्टी या पक्षाने त्यांच्या दि. ३०.०९.२०१६ च्या पत्रान्वये दंडापोटी रू.१.०० लाख चा धनाकर्ष आयोगास सादर करून त्यापक्षाची नोंदणी रद्द करण्याच्या निर्णयाचा फेर विचार करण्याची विनंती केली होती,

आणि ज्याअर्थी, सर्व कागदपत्रांची पूर्तता उक्त राजकीय पक्षाने दि. ३०.९.२०१६ पर्यंत केलेली आहे,

आणि ज्याअर्थी, दि. २६.०८.२०१६ रोजी राज्य निवडणूक आयोगाने काढलेल्या परिपत्रकात मार्गदर्शक सुचना केल्या आहेत,

त्याअर्थी, **आंबेडकरवादी रिपब्लीकन पार्टी** या पक्षाची नोंदणी राज्य निवडणूक आयोगाकडे कायम ठेवण्यात येत आहे.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(शेखर चन्द्रे)
सचिव ,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

अध्यक्ष / सचिव,
**आंबेडकरवादी रिपब्लीकन पार्टी,**
**ईश्वरबाबू घांगळे, घांगळे लॉन व सभागृह राष्ट्रभाषेच्या मागे,**
**नागरी बँक कॉलनी, वर्धा.**

प्रत,

१. सर्व जिल्हाधिकारी,
२. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
३. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने